# भूगोल विभाग अहवाल

लोक महाविद्यालयात भूगोल हा विषय २००६-०७ या शैक्षणिक सत्रात अभ्यसाला जातो. भूगोल या विषयाचे व्यवहारीक महत्व लक्ष्यात घेता हा विषय विद्यापीठ स्तरावर शिकवीला जातो. भूगोल हा विषय अनेक स्पर्धात्मक परिक्षेकरीता जसे यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी. करीत अत्यंत महत्वपूर्ण आहे. तसेच आपण ज्या वातावरणात राहतो त्याच्या बद्दलचे कुतुहम नेहमीच आपल्याला राहीले आहे. पृथ्वीची निर्मीती, वातावरण, जलावरण, तापमानात होणारी वाढ, घटते पर्जन्य, लोकसंख्या वाढ, प्रदुषण अशा अनेक बाबी आपल्या रोजच्या जीवनात पाहायला मिळतात. त्याच अनुषंगाने हा विषय पदवी /बी.ए. च्या अभ्यासक्रमात अत्यंत महत्वपूर्ण आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांच्या अभ्यासक्रमानुसार सत्र २०१४-२०१५ या शैक्षणिक वर्षात बी.ए. भाग १ ला भूरुपशास्त्र, बी.ए. भाग २ ला हवामानशास्त्र तर बी. ए. भाग ३ ला भारताचा भूगोल ह्या विषयाचे अक्ष्यापन करण्यात आले. भूगोल विभागतर्फे भूगोल अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. भूगोल अभ्यास मंडळाचा अध्यक्ष तुषार पुयाड तर सचिव म्हणून भाग्यश्री तराळे यांची निवड करण्यात आली. या सत्रामध्ये विद्यार्थ्यांसाठी आजचे पर्यावरण आणि मानव या संदर्भात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यात पर्यावरणसमतोल बिघडण्यात मानवाचा होणारा हस्तक्षेप व यावर उपाय यावर चर्चा करण्यात आली. या करिता प्रमुख पाहूणे म्हणून मा. श्री. जितेंद्र सातपुते सर उपस्थित होते.

दि. १४ जानेवारी हा दिवस भूगोल दिवस म्हणून साजरा करण्यात आला. यात विद्यार्थ्यांनी वृक्षलागवडीचे महत्व या विषयावर प्रभातफेरी काढली. अभ्यासक्रमाचा भाग म्हणून बी.ए. भाग ३ च्या विद्यार्थ्यांना गावाचा सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करावयाचा असतो त्याअनुषंगाने आम्ही उमरी मेघे या गावाची निवड केली. दि. ३१ जानेवारी २०१५ ला उमरी (मेघे), या गावाला विद्यार्थ्यांना नेऊन तेथील ६० कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले व त्यात गावातील लोकसंख्या, जात, व्यवसाय, बाजारपेठ, आरोग्य या विविध विषयाची माहिती घेण्यात आली व त्यानुसार एक अहवाल तयार केल्या गेला.

वरिल सर्व उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे, लो.शि.प्र.मंडख चे मा. अध्यक्ष व सर्व पदाधिकारी तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

प्रा. पंकज दि. गोरडे

भूगोल विभाग प्रमुख

लोक महाविद्यालय, वर्धा